गृह विभाग

कारागृह विभागात स्वीय प्रपंजी लेखा पद्धती सुरु करणेबाबत..

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,

शासन निर्णय, गृह विभाग क्र. जेलडी २२९०/३१[१८५]/जोडारस्त-१,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ दिनांक: २७ सप्टेंबर, १९९५.

वाचा: शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण १०९०/सीआर-३६४/९०/व्यय-८,
दिनांक १६ जुलै, १९९०.

निर्णय :- कैद्यांना तुरुंगात ठेवण्यामागील हेतु त्यांच्यामध्ये सुधारणा व्हावी व त्यांचे पुनर्वसन योग्यदृष्टीने होणे हा असून त्यासाठी त्यांना योग्य ते शिक्षण देणे व त्यांचे मन गुन्ह्यापासून परावृत्त करणे आवश्यक आहे. कारागृहात कैद्यांना कार्यमग्न ठेवणे त्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर व्यावसायिक दृष्ट्या तयार करणे व मानवी शक्तीचा सदुपयोग करुन घेणे असे अनेक हेतु असून त्यासाठी कारागृहात उद्योगधंदे सुरु करण्यात आलेले आहेत. सध्या या उद्योगासाठी "२०५६-तुरुंग १०२ तुरुंग निर्मित वस्तू" या लेखा शीर्षाखाली अनुदान मंजूर केले जाते. शासन स्तरावर अंदाजपत्रकाची छाननी करताना मागील ३ वर्षांचा खर्च विचारात घेऊन अनुदान मंजूर केले जाते व अनुदानाची मागणी जास्त असली तरी तेवढे अनुदान मंजूर करणे नेहमीच शक्य होईल असे समजता येणार नाही. त्यामुळे कच्चा माल खरेदी करण्याकरीता अर्थसंकल्पीत तरतूद अपुरी पडते. परिणामी कैदी कामाविना बसून राहतात व उत्पादनाला विक्री धरून असणारे आर्थिक नुकसान होते या सर्वांचा विचार होऊन कारागृह विभागामध्ये नवीन लेखा पद्धत सुरु करण्याबाबत विचार करण्यासाठी शा. नि. वि. वि. संकीर्ण १०९०/सीआर-३६४/९०/व्यय-८, दिनांक १६ जुलै ९० अन्वये एक समिती गठीत करण्यात आली. या समितीने कारागृह विभागातील सध्याच्या लेखा पद्धतीचा अभ्यास करुन त्यात पुढील दोष असल्याचे नमूद केले आहे.

१] अंदाजपत्रक तयार करताना वार्षिक अंदाजात पुढील २० महिन्याचा मागणीचा ओघ व मागणीची पूर्तता करण्यास लागणारा कच्चा माल यांचा यथार्थ अंदाज घेऊ शक-

२] इतर विभागाचे अनुदानात व्यय झाली की त्या रकमेवर परिणाम होतोच.

३] अनुदान आहे म्हणून खरेदी अन्यथा मागणी येते तेव्हा कच्चा माल खरेदीस अनुदान नसते. त्यामुळे कच्च्या मालाची कमी-जास्त खरेदी नाकारता येत नाही.

४] सर्व खर्च योग्य प्रकारे लेखांकीत होत नाहीत. पुस्तकी समायोजन महालेखापाल यांच्याकडे पूर्ण नोंद होत नाही. विभागाचे ... ०-४ अंत्यक पडतात ... लेखाव्यतिरिक्त खर्च नोंदी होत नाहीत.

5] मागणी पुरवठा यांचा समन्वय साधणे इतक्या स्थापितेचा तीव्र अभाव.

6] कारागृहातील वस्तू कारागृहात वापरावयाच्या निर्णयाच्या नोंदी इतरत्र न र्थित होताना अंदाजपत्रकात व महालेखापाल यांचेकडील नोंदीत उल्लेख होत नाही.

7] कोषागारातून रक्कम उपलब्ध करण्याच्या कार्यवाहीत विलंब होत असल्याने वेळीच प्रदान करण्यात अडचणी येतात.

8] अंदाजपत्रक, मागणी, उत्पादन यांचा मेळ होऊ शकत नाही, पर्यायाने साठा अनिर्बंध राहून काही माल शिल्लक राहू शकतो.

9] नियोजनाचा अभाव निर्माण होतो. तसेच, अंमलबजावणीत अडचणी निर्माण होतात.

2. वरील दोष दूर करून पुढील कारणामुळे कारागृह विभागामध्ये स्वीय प्रपंजी लेखा पद्धती सुरू करावी अशी शिफारस समितीने शासनास केली आहे.

1] कार्यालयांची मागणी व कार्यालयाने करण्याचा पुरवठा यात समन्वय.

2] अंदाजपत्रक व अनुदान यातील दैनंदिन अडचणीवरील दीर्घकालीन उपाययोजना.

3] मागणीनुसार उत्पादन, त्यामुळे महसूलात वाढ.

4] मागणीनुसार उत्पादन, त्यामुळे गरजेइतकाच कच्चा माल खरेदी.

5] सर्व व्यवहार रोख, त्यामुळे महसूल त्वरित जमा होईल.

6] महसूल वसूलीत वापरता येणे शक्य झाल्याने उत्पादनाचे प्रक्रियेतील आवर्ती खर्चात निधी उपलब्ध होईल.

7] समायोजन व स्वतःसाठी उपयोग यासंदर्भात रोख लेखा त्यामुळे जास्त अचूकता.

8] कार्यालयाच्या मागणीनुसार पुरवठा करण्याची कार्यक्षमता यासाठी नियोजन व अंमलबजावणी करता येईल.

9] धनादेश आहरण सुविधा व्यवहारात वाढ होऊ शकेल, वारंवार प्रदानातील विलंब टाळता येईल.

10.] निधीचा जमाव वापर करून उत्पादन वाढीत जास्त महसूल उपलब्ध होऊन अशक्तीचा वापर करणे शक्य होईल. कच्चा माल नाही म्हणून उत्पादन नाही, म्हणून महसूल नाही हे दुष्टचक्र थांबविता येईल.

11] बंदीजनांना जास्तीत जास्त प्रशिक्षण मिळेल.

3. समितीने केलेली सदर शिफारस लक्षात घेऊन कारागृह विभागात मर्यादित प्रमाणात स्वीय प्रपंजी लेखा पद्धती सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता आता व त्यानुसार [illegible] कारागृह विभागामध्ये स्वीय प्रपंजी लेखा पद्धती सुरू करण्यास शासन या आदेशाद्वारे मान्यता देत आहे. मात्र सदर स्वीय

लेख्याचा वापर असा शासकीय संस्थाकडून/ महामंडळाकडून मिळणा-या रकमा जमा करण्यासाठी व त्यातून गरजेनुसार योजनेचा खर्च करण्यासाठी करण्यात यावा. शासकीय विभागाच्या/संस्थांच्या बाबतीत सध्याप्रमाणे पुरवणी मागणीची पध्दत यापुढे चालू ठेवण्यात यावी. त्यासाठी अर्थसंकल्पात दरवर्षी करण्यात येणा-या तरतूदीतून सुरुवातीस खर्च करण्यात यावा व अर्थसंकल्पीत केलेली तरतूद कमी पडली तर वर्ष अखेरीस स्वीय प्रपंजी लेख्यात जमा केलेली रक्कम वापरावी.

४. स्वीय प्रपंजी लेख्यातून खालील बाबींवर खर्च करण्यात यावा. असेही आदेश शासन देत आहे.

कच्चा माल.

२] उपभोग्य भांडार वस्तु.

३] उत्पादन प्रक्रियेत वापरली जाणारी व नष्ट होणारी [illegible] व हत्यारे,

यंत्रसामुग्रीची दुरु [illegible]

६] बंद्यांची मजुरी.

७] जाहिरात खर्च [प्रतिकारागृहासाठी रु.५०००/- प्रतिवर्ष]

८] कारागृहाच्या विद्युतीकरणासाठी लागणारा खर्च.

५. स्वीय प्रपंजी लेखा कार्यान्वीत करताना पुढीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी.

१] ज्या बाबीसाठी स्वीय प्रपंजी लेखा मंजूर केला आहे त्याव्यतिरिक्त इतर कार्यासाठी कोषागारातून कोणतीही रक्कम काढू नये.

२] मासिक जमाखर्चाचा मेळ प्रत्येक कारागृहाने न चुकता कोषागारात घ्यावा.

३] प्रत्येक कारागृहाने १५ तारखेच्या आत मागील महिन्याच्या संबंधीत लेखा महालेखापाल व कोषागार अधिकारी यांना पाठवावा.

४] स्वीय लेख्यातून पैसे काढण्यासाठी धनादेशावर सही करण्याचे अधिकार संबंधित कारागृह **अधिक्षक** अधिकारात राहतील.

६. स्वीय प्रपंजी लेखापध्दती "२०५६-तुरुंग-१०२-तुरुंग - निर्मित वस्तु" या लेखा शीर्षाखाली सुरु करावी तसेच महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम [illegible] तसेच भाग-७ मधील सूचनांचेही तंतोतंत पालन करावे.

७.   हे आदेश महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र-१, मुंबई तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौ. संदर्भ क्र. तोशार २८५/२५ व्यय-८, दिनांक २६.७.२५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[अ.ना.भोसले]

कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,

कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे/मध्य विभाग, औरंगाबाद,

पूर्व विभाग नागपूर/ दक्षिण विभाग भायखळा, मुंबई,

सर्व अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह,

सर्व अधिक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-१, वर्ग-२,

महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा] महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,

निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

वित्त विभाग [व्यय-८],

गृह विभाग [प्रीपुडी-१].